

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २७९। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) | शनिवार २१/११/२०२६ पाने - ६



खासगी रुग्णालयांवर येणार सरकारी नियंत्रण

रुग्णांची आर्थिक लूट थांबणार? हिवाळी अधिवेशनात अंतिम मंजुरी मिळण्याची शक्यता

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील खासगी रुग्णालयांकडून रुग्णांची होणारी आर्थिक लूट, मनमानी उपचार शुल्क आणि अवाजवी बिलिंगला आळा घालण्यासाठी राज्य सरकार आता कठोर पावले उचलण्याच्या तयारीत आहे. खासगी रुग्णालये, नर्सिंग होम, दवाखाने, पॅथॉलॉजी लॅब आणि डायग्नोस्टिक सेंटर यांच्या कामकाजावर सरकारी नियंत्रण आणणाऱ्या 'महाराष्ट्र वैद्यकीय आस्थापना नोंदणी व नियमन विधेयक'ला हिवाळी अधिवेशनात अंतिम मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. या विधेयकाची अंमलबजावणी झाल्यास राज्यातील खासगी आरोग्यसेवा क्षेत्रात मोठे बदल होणार असून सर्वसामान्य रुग्णांना मोठा दिलासा मिळू शकतो.



या विधेयकाच्या अनुषंगाने विधिमंडळ समितीच्या बैठका राज्यभर सुरू आहेत. नागपूर येथील विधिमंडळातही नुकतीच यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी ३ जुलै रोजी हे विधेयक विधिमंडळात सादर केले होते. त्यानंतर यावर विचारविनिमय करण्यासाठी समिती गठित करण्यात आली आणि राज्यातील विविध घटकांकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या. आता समितीच्या चर्चेनंतर हे विधेयक अंतिम मंजुरीच्या दिशेने वाटचाल करत आहे.

प्रस्तावित विधेयकातील सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे खासगी वैद्यकीय संस्थांना विविध उपचारांचे दर रुग्णालयाच्या दर्शनी भागात तसेच अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध करावे लागणार आहेत. एकदा जाहीर केलेल्या दरापेक्षा अधिक शुल्क आकारण्यावर निर्बंध येणार आहेत. रुग्णांना प्रत्येक उपचाराचे तपशीलवार बिल देणेही बंधनकारक असेल. त्यामुळे उपचार सुरू करण्यापूर्वीच खर्चाची माहिती मिळण्यास मदत होणार असून अवाजवी बिल आकारणाऱ्या रुग्णालयांवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल.

या कायद्यानुसार खासगी रुग्णालये, नर्सिंग होम, प्रसूतीगृहे, खासगी दवाखाने, क्लिनिक, पॅथॉलॉजी लॅब, डायग्नोस्टिक सेंटर आणि डे केअर सेंटर अशा सर्व वैद्यकीय संस्थांना सरकारी प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक राहणार आहे. विनानोंदणी व्यवसाय करणाऱ्या संस्थांवर पहिल्या उल्लंघनासाठी एक लाख रुपये, दुसऱ्यांदा तीन लाख रुपये, तर त्यानंतर पाच लाख रुपयांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद प्रस्तावित आहे. दरम्यान, या विधेयकातील काही तरतुदींवर डॉक्टर आणि खासगी रुग्णालय चालकांनी आक्षेप नोंदवले होते. त्यांच्या सूचनांवर आणि अडचणींवर विधिमंडळ समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात आल्याची माहिती आमदार डॉ. राजीव पोतदार यांनी दिली.

या विधेयकाला अंतिम मंजुरी मिळून त्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास खासगी आरोग्यसेवेतील मनमानीला लगाम बसण्याची अपेक्षा आहे. उपचारांचे दर पारदर्शक होतील, अवाजवी बिलिंगला आळा बसेल, आपत्कालीन उपचार मिळण्याचा मार्ग सुकर होईल आणि रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण होण्यास मदत होईल.

आर्थिक परिस्थिती काहीही असो आपत्कालीन उपचार आवश्यक

आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाची आर्थिक स्थिती किंवा पैसे भरण्याची क्षमता विचारात न घेता प्राथमिक उपचार देणे बंधनकारक करण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. अपघात, गंभीर आजार किंवा जीवघेण्या परिस्थितीत पैशांअभावी रुग्णाला उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, हा यामागील प्रमुख उद्देश आहे. याशिवाय रुग्णांना त्यांच्या आजाराची आणि उपचारांची संपूर्ण माहिती मिळण्याचा अधिकार, वैद्यकीय कागदपत्रे प्राप्त करण्याचा अधिकार तसेच वैयक्तिक वैद्यकीय माहितीची गोपनीयता राखण्याची जबाबदारीही संबंधित संस्थांवर निश्चित करण्याचा प्रयत्न आहे.

ग्रामीण भागात भीषण पाणीटंचाई

संगमनेर शहरात मात्र पाण्याची उधळपट्टी!

युवावार्ता (प्रतिनिधी) :

संगमनेर- एकीकडे अपुऱ्या पावसामुळे राज्यातील अनेक भागांना दुष्काळ आणि भीषण पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करावा लागत असताना संगमनेर शहरात मात्र निळवंडे धरणाच्या पाईपलाईनमधून होणारा पाणीपुरवठा आणि प्रवरा नदीला मिळणाऱ्या सलग रोटेशनमुळे मुबलक पाणी उपलब्ध होत आहे. मात्र, या मुबलक पाण्याचा वापर काटकसरीने करण्याऐवजी शहरात अनेक ठिकाणी पाण्याची अक्षरशः उधळपट्टी सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. ग्रामीण भागात पाण्यासाठी टँकरची प्रतीक्षा करण्याची वेळ आली असताना शहरातील पाण्याचा हा बेजबाबदार वापर सुज्ञ नागरिकांमध्ये संताप निर्माण करणारा ठरत आहे.

संगमनेर तालुक्यातील पठार भागासह अनेक गावांमध्ये आतापासूनच पाणीटंचाई जाणवू लागली आहे. काही गावांमध्ये आणि वाड्यावस्त्यांवर पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असताना दुसरीकडे संगमनेर शहरात मात्र रस्त्यावर पाणी मारणे, खासगी वाहने धुणे, किरकोळ स्वच्छतेसाठी मोठ्या प्रमाणावर पाणी वापरणे, नळ सुरू ठेवून पाण्याचा अपव्यय करणे असे प्रकार सर्रास सुरू असल्याचे दिसून येत आहे. (पान २ वर)



आज मुबलक पाणी, उद्याचे काय?

सध्या प्रवरा नदीला रोटेशन सुरू असल्यामुळे नदीकाठच्या गावांना तसेच कालव्यांमधून अनेक भागांना पाणी उपलब्ध होत आहे. मागील काळात सुमारे ४० दिवस रोटेशन सुरू होते. त्यानंतर काही दिवसांतच पुन्हा प्रवरा नदीला पाणी सोडण्यात आले. त्यामुळे पाण्याची उपलब्धता वाढली असली तरी हे रोटेशन कायमस्वरूपी राहणार नाही, याचे भान ठेवणे गरजेचे आहे. एकदा रोटेशन बंद झाल्यानंतर पुढील रोटेशन कधी मिळेल, याची निश्चितता नसते. त्यामुळे सध्या उपलब्ध असलेल्या पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे.





सोमवारी मोदी मंत्रिमंडळाचा विस्तार ?

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार येत्या २३ नोव्हेंबर रोजी होण्याची दाट शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे. गेल्या काही महिन्यांपासून मंत्रिमंडळातील संभाव्य बदलांबाबत सुरू असलेल्या चर्चांना आता या खात्रीलायक माहितीमुळे बळ मिळाले आहे. अद्याप या विस्ताराची कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी, यावेळी काही बड्या नेत्यांना कॅबिनेटमध्ये संधी दिली जाणार असल्याचे समजते.




या संभाव्य मंत्रिमंडळ विस्तारात पश्चिम बंगालला विशेष प्राधान्य दिले जाण्याची चिन्हे आहेत. पश्चिम बंगालमध्ये भाजपची राजकीय ताकद अधिक भक्कम करण्यासाठी पक्षाचे राज्याध्यक्ष आणि राज्यसभा खासदार शमिक भट्टाचार्य यांना कॅबिनेटमध्ये स्थान मिळण्याची आघाडीवर चर्चा आहे. सद्यस्थितीत पश्चिम बंगालमधून बालुरघाटचे लोकसभा खासदार सुकांत मजूमदार आणि बनगावचे खासदार शांतनू ठाकूर हे केंद्रात मंत्री आहेत. मजूमदार यांच्याकडे शिक्षण आणि ईशान्य क्षेत्र विकास राज्यमंत्रिपद, तर ठाकूर यांच्याकडे बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग या खात्याचे राज्यमंत्रिपद आहे.

राजधानी दिल्लीमध्ये वाढलेल्या राजकीय हालचालींमुळे विस्ताराच्या शक्यतेला दुजोरा मिळत आहे. नुकतीच पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली, ज्यामध्ये विद्यमान मंत्र्यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर बुधवारी रात्री पंतप्रधानांच्या निवासस्थानी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन आणि भाजप नेते बी. एल. संतोष यांची प्रदीर्घ बैठक झाली.









रोजगार देण्याची जबाबदारी उद्योगपतींची की सरकारची? - विजय वडेट्टीवार



मुंबई (वृत्तसंस्था)

गेली १२ वर्षे दरवर्षी २ कोटी रोजगार देण्याचे आश्वासन देणारे आणि उद्योगपतींचे तब्बल १६ ते १७ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आता रोजगार निर्मितीची जबाबदारी उद्योगपतींवर ढकलत आहेत. नोकऱ्या देण्याची जबाबदारी सरकारची आहे की उद्योगपतींची? स्वत:चे अपयश लपवून उद्योगपतींकडे बोट दाखवणे हा तर 'उलटा चोर कोतवाल को दाटे' असा प्रकार आहे, अशा तिखट शब्दांत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. शुक्रवारी (२० नोव्हेंबर २०२६) नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी भाजप आमदारांच्या शिक्षेनंतरही त्यांना दिले जाणारे अभय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल स्मारकाचा रखडलेला प्रकल्प, राज्यातील भीषण दुष्काळ आणि दीक्षाभूमी स्थानक नामकरणाच्या मुद्द्यावरून महायुती सरकारला धारेवर धरले.

गुरुवारी (१९ नोव्हेंबर) 'फिक्की'च्या (ऋखउउख) कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्योगपतींना रोजगार निर्मितीबाबत केलेल्या आवाहनाचा विजय वडेट्टीवार यांनी खरपूस समाचार घेतला. सरकारने गेल्या १२ वर्षांत 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस'च्या नावाखाली उद्योगपतींचे १६ लाख कोटी रुपये माफ केले, कॉर्पोरेट कर ३० टक्क्यांवरून २२ टक्क्यांवर आणला आणि १२ लाख रुपयांपर्यंत करसवलत दिली.

फटाके विक्रीवर बंदी घालावी लागेल - उच्च न्यायालय



मुंबई (वृत्तसंस्था)

फटाके फोडण्याबाबत दिलेल्या निर्देशांचे मुंबई आणि ठाणे महापालिका क्षेत्रांत सर्रास उल्लंघन झाले असून त्यामुळे हवेची गुणवत्ताही खालावली आहे. पालिका आणि पोलिस यंत्रणा यावर नियंत्रण ठेवण्यात असमर्थ ठरत असतील, तर राज्यातील शहरांमध्ये यापुढे फटाके विक्रीवरच बंदी घालावी लागेल, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी नोंदवले. या सर्व याचिकांवरील अंतिम निर्णय न्यायालयाने राखून ठेवला आहे.आगीच्या ३३५ घटना; सणाऐवजी घरात दु:खदिवाळीच्या दिवसांत ३३५ ठिकाणी फटाक्यांमुळे आगी लागल्या. लोकांच्या मालमत्तेचे नुकसान झाले. तर, काही ठिकाणी जीवितहानी झाली. दिवाळीचा सण साजरा होण्याऐवजी त्यांच्या घरात दु:ख होते. दुसऱ्यांच्या जीवाच्या किमतीवर फटाके वाजवले. लोकांच्या या मानसिकतेला काय बोलायचे? न्यायालयाच्या आदेशांना धाब्यावर बसवून पहाटेपर्यंत फटाके वाजवले. लोक असे का वागत आहेत? न्यायालयाला हे सांगण्याची वेळ का येते? नागरिकांनी स्वत:च बदल घडवावा. इतक्या दुर्घटना घडूनही फटाक्यांचे उत्पादन करणारे किंवा नागरिक पुढाकार घेताना दिसत नाहीत, असे न्या. गिरीश कुलकर्णी व न्या. डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने म्हटले.जीवाशी खेळून व्यवसाय करण्याचा अधिकार नाहीफटाक्यांमुळे होणाऱ्या ध्वनी व वायू प्रदूषणाची गांभीर्याने दखल घेत न्यायालयाने स्वत:हून याचिका दाखल करून घेतली. काही फटाके विक्रेत्यांनीही न्यायालयात धाव घेतली. व्यवसाय करण्याच्या आपल्या अधिकारावर गदा येत असल्याचा त्यांनी युक्तिवाद केला. त्यावर न्यायालयाने त्यांना सुनावले. तुम्हाला व्यवसाय करण्याचा अधिकार आहे. मात्र, नागरिकांच्या जीवाशी खेळ करून व्यवसाय करण्याचा अधिकार नाही. फटाक्यांमुळे प्रदूषण होते, जीवितहानी होते, हे मान्य करूनही तुम्हाला व्यवसाय करायचा आहे? असे न्यायालयाने म्हटले. मुंबई महापालिकेने आणि पोलिसांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. मात्र, परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आहे. पालिका आणि सरकार हतबल असेल तर राज्यातील शहरांमध्ये फटाके विक्री करण्यास बंदी घालावी लागेल, असे निरीक्षण नोंदवित न्यायालयाने या याचिकेवरील निर्णय राखून ठेवला.

सौ. नलिनी अरुण रुद्रभटे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील प्रतिष्ठित उद्योजक प्रविण रुद्रभटे यांच्या मातोश्री नलिनी अरुण रुद्रभटे (वय ८६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

शहरातील गोविंद नगर येथील रहिवासी असलेले अरुण रुद्रभटे हे सेवानिवृत्त बँक अधिकारी आहे. त्यांच्या पत्नी सौ. नलिनी रुद्रभटे या काही दिवसांपासून आजारी होत्या. त्यातच त्यांचे निधन झाले. त्यांचा स्वभाव अतिशय धार्मिक व प्रेमळ होता. त्यांच्या पश्चात पती अरुण रुद्रभटे, मुले उदय, विकास, प्रविण, एक मुलगी स्मिता तसेच सूना, नातवंडे असा परिवार आहे. कै. नलिनी रुद्रभटे यांना गाडेकर - रूद्रभाटे असोसिएट, युनिटी बिल्टेक प्रा. लि. पुणे, दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

शिवसेना भटक्या-विमुक्त समाज जिल्हाध्यक्षपदी प्रकाश पवार यांची निवड!



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाच्या वतीने प्रकाश पवार यांची भटक्या-विमुक्त समाज जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. आमदार अमोल खताळ यांचे खंदे समर्थक आणि एक निष्ठावंत शिवसैनिक म्हणून प्रकाश पवार यांनी गेल्या अनेक वर्षांपासून पक्षासाठी केलेल्या प्रामाणिक कार्याची पक्षाने घेतलेली ही महत्त्वपूर्ण दखल मानली जात आहे.

त्यांच्या या निवड प्रसंगी आमदार अमोल खताळ यांनी प्रकाश पवार यांचा विशेष सत्कार केला आणि त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या नव्या जबाबदारीतून भटक्या विमुक्त समाजाचे प्रलंबित प्रश्न, हक्क आणि न्यायासाठी त्यांचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याप्रसंगी आमदार अमोल खताळ यांच्यासह शिवसेनेचे इतर पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून - ग्रामीण भागात भीषण...

पालिकेच्या वतीने वारंवार नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जात आहे. मात्र, या आवाहनाला काही नागरिकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. पिण्याच्या पाण्याचा वापर रस्ते धुण्यासाठी आणि अनावश्यक कामांसाठी होत असल्याने उपलब्ध पाण्याचे महत्त्व नागरिकांना कधी समजणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

भंडारदरा धरणात समाधानकारक पाणीसाठा असला तरी पुढील वर्षी पावसाचे प्रमाण किती असेल, याचा अंदाज आज बांधता येत नाही. त्यामुळे भविष्यातील पाणीटंचाईचे संकट लक्षात घेऊन धरणातील पाण्याचे नियोजन करणे प्रशासनासाठीही महत्त्वाचे ठरणार आहे. पाणी बचतीचे आवाहन केवळ प्रसिद्धीपुरते मर्यादित न राहता त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याची गरज आहे. पाण्याचा अतिरिक्त वापर करणारी कुटुंबे, व्यावसायिक आस्थापना आणि संस्था यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पालिका प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात. अनावश्यक पाणी वापरावर निर्बंध घालावेत. नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबरोबरच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर आवश्यकतेनुसार दंडात्मक कारवाई करण्याची भूमिका घ्यावी. आज राज्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष सुरू आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. अशा परिस्थितीत संगमनेर शहराला मिळणारे मुबलक पाणी ही कायमस्वरूपी सुविधा समजण्याची चूक नागरिकांनी करू नये. पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल आहे. आज पाणी उपलब्ध आहे म्हणून त्याची उधळपट्टी करण्यापेक्षा उद्याच्या संकटासाठी आजपासूनच पाणी बचतीची सवय लावणे आवश्यक आहे. पाणी ही केवळ आजची गरज नाही, तर उद्याच्या पिढ्यांचीही जबाबदारी आहे. त्यामुळे नागरिक आणि प्रशासन या दोघांनीही पाणी बचतीचे धोरण गांभीर्याने राबविले, तरच भविष्यातील संभाव्य जलसंकटाची तीव्रता कमी करता येईल.

दुष्काळात शेतकऱ्यांना वसुलीसाठी त्रास देणाऱ्या फायनान्स कंपन्यांवर कारवाई -महसूलमंत्री



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने उपाययोजना सुरू केल्या आहेत. दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३१० वर पोहोचली असून, पाणीपुरवठा योजनांची रखडलेली कामे पूर्ण करण्यासाठी ४८८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याचबरोबर दुष्काळाच्या काळात कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांना तगादा लावणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्या आणि बँकांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. शेतकऱ्यांनी कर्जवसुलीच्या दबावाखाली आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये, तर पोलीस, जिल्हाधिकारी किंवा लोकप्रतिनिधींकडे तक्रार करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत आणखी सहा तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे यापूर्वीच्या ३०४ तालुक्यांची संख्या आता ३१० झाली आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनंतर आमदार शिवाजी पाटील, अशोकराव माने आणि मंत्री हसन मुश्रीफ यांच्या पाठपुराव्याने गडहिंग्लज तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली. याशिवाय आणखी १३ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्याच्या मागण्या शासनाकडे आल्या आहेत. या तालुक्यांची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने अहवाल सादर करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या असून, त्यानंतर सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितलेशेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आणि बेकायदा सावकारी तसेच मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या वसुलीच्या पद्धतींना आळा घालण्यासाठी सरकारने जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना स्पष्ट निर्देश दिले आहेत. बावनकुळे म्हणाले, 'मायक्रो फायनान्स कंपन्या किंवा बँकांकडून शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी तगादा लावला जात असेल, तर त्यांनी घाबरून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये. त्याऐवजी थेट पोलिसांत किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. ग्रामपंचायतीपासून ते संसदेपर्यंतच्या कोणत्याही लोकप्रतिनिधीकडे तक्रार केली, तरी त्यातून मार्ग काढला जाईल. दुष्काळाच्या काळात कोणत्याही फायनान्स कंपनीने शेतकऱ्यांना वसुलीसाठी त्रास देऊ नये. तसे झाल्यास संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई केली जाईल.'

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी रखडलेल्या पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यावरही सरकारने भर दिला आहे. ७५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित निधीअभावी रखडलेल्या योजनांसाठी ४०० कोटी रुपये देण्यात आले आहेत. तसेच पाच ते दहा टक्के किंवा दहा ते वीस टक्के काम शिल्लक असलेल्या योजनांसाठी स्वतंत्रपणे ८८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

'अकवान' चक्रीवादळाचा किनारपट्टीला तडाखा! आंध्र प्रदेश-ओडिसात हाय अलर्ट

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या 'अकवान' चक्रीवादळाने अखेर उत्तर आंध्र प्रदेश आणि दक्षिण ओडिशाच्या किनारपट्टीवर धडक दिली आहे. गुरुवारी सकाळी ७.३० ते ८.३० या कालावधीत गोपाळपूरजवळ वादळाने किनारपट्टी ओलांडण्यास सुरुवात केली. यावेळी वाऱ्यांचा वेग ताशी ७० ते ८० किलोमीटर असून, काही ठिकाणी वाऱ्यांचे झोत ताशी ९० किलोमीटरपर्यंत पोहोचत आहेत. भारतीय हवामान विभागाच्या (खचऊ) माहितीनुसार, चक्रीवादळाची लँडफॉल प्रक्रिया आणखी तीन तास सुरू राहण्याची शक्यता आहे.

चक्रीवादळाच्या प्रभावामुळे आंध्र प्रदेश आणि ओडिशाच्या किनारपट्टी भागात हवामान कमालीचे बदलले असून जोरदार वारे आणि मुसळधार पावसाचा धोका निर्माण झाला आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन हवामान विभाग आणि स्थानिक प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे तसेच सुरक्षिततेच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

वादळाचे केंद्र गोपाळपूर परिसरात असून, ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. समुद्रात सुमारे ०.५ मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे आंध्र प्रदेशातील विजयनगरम आणि श्रीकाकुलम, तसेच ओडिशातील गंजाम आणि पुरी जिल्ह्यांमधील सखल भागांमध्ये पाणी साचण्याचा धोका आहे. याशिवाय, पुढील २४ तासांत ओडिशा, आंध्र प्रदेशची किनारपट्टी, पश्चिम बंगाल आणि झारखंडमधील काही भागांमध्ये अचानक पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यताही हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

चक्रीवादळाचा संभाव्य धोका लक्षात घेऊन ओडिशा प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर बचाव आणि स्थलांतर मोहीम हाती घेतली आहे. दक्षिण विभागाचे महसूल विभागीय आयुक्त विजय अमृता कुलांगे यांनी एएनआयशी बोलताना प्रशासनाच्या तयारीची माहिती दिली. गजपती जिल्ह्यातील २२ हजारांहून अधिक, तर कंधमाळ जिल्ह्यातील १३ हजारांपेक्षा जास्त नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. स्थलांतरित नागरिकांना आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. कोणालाही आरोग्यविषयक अडचण निर्माण झाल्यास तातडीने उपचार मिळतील, यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आल्याचे कुलांगे यांनी सांगितले. या आपत्तीमध्ये मनुष्यहानी किंवा पशुधनाची हानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने विविध पथके तैनात केली आहेत. विशेषतः डोंगराळ भाग, दरडी कोसळण्याची शक्यता असलेले परिसर आणि भूस्खलनप्रवण क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या धोकादायक भागांतील नागरिकांना आधीच सुरक्षित स्थळी हलवण्यात आले असून वाहतूक व्यवस्थेवरही प्रशासनाकडून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. दरम्यान, अकवान चक्रीवादळाचा प्रभाव विशाखापट्टणमच्या किनारपट्टीवरही जाणवू लागला आहे. समुद्रात मोठ्या आणि उंच लाटा उसळत असल्याने किनारपट्टीवरील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

सुरक्षेच्या कारणास्तव मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच पर्यटकांनाही किनारपट्टीच्या परिसरात जाण्यास मनाई करण्यात आली आहे.

राज्यातील दुष्काळी तालुक्यांत अनावश्यक बांधकामांना स्थगिती

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील ३१० दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये निर्माण झालेल्या टंचाईसदृश परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य सरकारने जिल्हा वार्षिक योजनेतील निधीच्या वापराबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी व चारा, जलस्रोतांचे बळकटीकरण आणि अत्यावश्यक स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश नियोजन विभागाने दिले आहेत. त्याचवेळी पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होणारी आणि टंचाई निवारणासाठी अत्यावश्यक नसलेली नवीन बांधकामे दुष्काळाची घोषणा लागू असेपर्यंत तात्पुरती स्थगित करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार उद्याने, सुशोभीकरण, नवीन प्रशासकीय इमारती, सिमेंट रस्ते आणि गटारांच्या कामांचाही आढावा घेतला जाणार आहे. गुरुवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला.

या निर्णयानुसार, टंचाईग्रस्त गावांपर्यंत उपलब्ध जलस्रोतांमधील पाणी पोहोचविण्यासाठी अपूर्ण जलवाहिन्या, पंप, विद्युत जोडण्या, साठवण टाक्या आणि वितरण यंत्रणा पूर्ण करता येणार आहेत. दोष दायित्व कालावधी संपलेल्या पाणीपुरवठा योजनांमधील नादुरुस्त घटकांची दुरुस्ती, पाण्याची गळती रोखणे आणि उपलब्ध जलस्रोतांची टंचाईग्रस्त भागांशी जोडणी करण्यावर भर दिला जाणार आहे. कमी निधीअभावी अपूर्ण



राहिलेली आणि अल्पावधीत पूर्ण होऊ शकणारी कामेही प्राधान्याने हाती घेता येतील. दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांतील जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.ण्याच्या पाण्याचे विद्यमान स्रोत बळकट करणे, त्यांचा सुरक्षित आणि कार्यक्षम वापर करणे, जलसंधारण व सिंचनाच्या माध्यमातून टंचाई निवारणाला मदत करणारी कामे पूर्ण करणे, तसेच नवीन जलस्रोत निर्माण करून पाण्याची साठवण क्षमता वाढविण्यालाही प्राधान्य दिले जाणार आहे. पशुधनासाठी पाणी आणि चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजना, सार्वजनिक आरोग्य, अत्यावश्यक स्वच्छता आणि उपजीविकेशी संबंधित कामांचाही यात समावेश आहे. नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रांमध्ये ३१ मार्च २०२७ पूर्वी पूर्ण होऊ शकणारे जलशुद्धीकरण प्रकल्प (डब्ल्यूटीपी), सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी), सांडपाण्याचा पुनर्वापर, सौर ऊर्जा प्रकल्प, जलप्रदूषण प्रतिबंधक आणि घनकचरा व्यवस्थापनाची अत्यावश्यक कामेही करता येणार आहेत.

दुसरीकडे, टंचाई काळात पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होणारी आणि तातडीने आवश्यक नसलेली नवीन कामे स्थगित करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. नवीन उद्याने, सुशोभीकरण, कार्यालयीन व प्रशासकीय इमारती, ग्रामीण आणि इतर जिल्हा मार्गांवरील सिमेंट रस्ते, मोठ्या ग्रामपंचायत योजनांमधील अंतर्गत सिमेंट रस्ते, नवीन नाले आणि गटारांची कामे यांचा त्यात समावेश असू शकतो. किरकोळ दुरुस्तीच्या नावाखाली नवीन बांधकामे करता येणार नाहीत. मात्र, यापूर्वी सुरू झालेल्या सर्व कामांना सरसकट स्थगिती देण्यात आलेली नाही. कराराच्या अटी, सार्वजनिक सुरक्षितता, झालेला खर्च, काम थांबविल्यास होणारे नुकसान आणि संभाव्य आर्थिक दायित्व यांचा विचार करून प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्र निर्णय घ्यावा लागणार आहे. प्रशासकीय मान्यता मिळाली असली, तरी प्रत्यक्ष सुरू न झालेली कामे पुढे ढकलण्याबाबत कारणांसह निर्णय घ्यावा लागेल.

टंचाई निवारणासाठी अत्यावश्यक असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या योजना, जलस्रोत बळकटीकरण, नवीन जलस्रोत निर्मिती, पशुधनासाठी पाणी व चारा, जलसंधारण, लघुसिंचन आणि सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेच्या कामांना या स्थगितीतून वगळण्यात आले आहे. मात्र, अशा कामांना संबंधित योजनांच्या निकषांनुसार मंजुरी असणे आवश्यक आहे.

ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र त्रिमुखे यांचे निधन



अहिल्यानगर -

अहिल्यानगरच्या पत्रकारितेचा संवेदनशील चेहरा हरपला असल्याची भावना पत्रकारिता क्षेत्रातून व्यक्त होत आहे. कारण ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र त्रिमुखे यांचे अल्पशा आजाराने आज शुक्रवारी पहाटे निधन झाले.

अहिल्यानगरमधील ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र (राजाभाऊ) त्रिमुखे (वय ५६) यांचे शुक्रवारी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. विविध वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून त्यांनी गेली अनेक वर्षे निर्भीडपणे पत्रकारिता केली. सामान्य माणसाचे प्रश्न मांडणारा एक संवेदनशील पत्रकार आणि मनमिळावू माणूस आज आपल्यातून अचानक निघून गेला असल्याची भावना व्यक्त होत आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्रिमुखे कुटुंबीयांना या दु:खातून सावरण्याचे बळ मिळो. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. राजेंद्र त्रिमुखे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.










पोखरी हवेली येथे गावबांधीलकीद्वारे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

युवावाता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील पोखरी हवेली येथे ग्रामस्थ भजनी मंडळाच्या वतीने सलग ३० व्या वर्षी अखंड हरिनाम सप्ताह, श्री एकनाथी भागवत व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. १८ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या या धार्मिक सोहळ्याची सांगता बुधवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

या सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी हरिपाठ, संतचरित्र कथा, प्रवचन आणि रात्री हरिकीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. ह.भ.प. रघुनाथ महाराज गवांदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडत आहे.



बुधवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता सद्गुरू महंत रामगिरी महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या सोहळ्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पोखरी हवेली ग्रामस्थांनी केले आहे.

शिक्षक समृद्ध झाल्याशिवाय शिक्षणाची गुणवत्ता वाढणार नाही ! - शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे

युवावार्ता (प्रतिनिधी)

प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकांनी स्वतःला समृद्ध आणि अद्ययावत करण्याची गरज आहे. शिक्षक समृद्ध झाल्याशिवाय शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे शक्य नाही. शिक्षण क्षेत्रातील बदलत्या प्रवाहांचा स्वीकार करून शिक्षकांनी आपल्या ज्ञानात सातत्याने भर घालावी, प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे योजना शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे यांनी केले. संगमनेर येथे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने निवड व वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षार्थी शिक्षकांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशिक्षण समन्वयक ज्योती निंबाळकर .व्यासपीठावर जिल्हा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सुनील नरसाळे, सहाय्यक समन्वयक सुनील घुले उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना शिक्षणाधिकारी बुगे म्हणाले की, केंद्र सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केल्यानंतर शिक्षण क्षेत्रात मोठे परिवर्तन अपेक्षित आहे. भारतीय ज्ञानपरंपरेत आपले असलेले



स्थान पुन्हा प्राप्त करण्यासाठी मातृभाषेतून दिलेले शिक्षण विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजते. मात्र, आज मातृभाषेऐवजी परकीय भाषेतून शिक्षण घेण्याकडे पालक आणि विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही बाब चिंताजनक आहे. मातृभाषेतून शिक्षण घेत असतानाही दहावीच्या परीक्षेत मोठ्या संख्येने विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असतील, तर शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनात रुजवलेल्या विचारांमुळे अनेकांचे आयुष्य बदलल्याचा इतिहास आहे. त्यामुळे शिक्षक हे केवळ ज्ञानदान करणारे नसून समाजपरिवर्तनाचे महत्त्वाचे दूत आहेत. आज शिक्षणाच्या माध्यमातून माणसाच्या आयुष्याचा कायापालट होत असेल, तर शिक्षणाकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची आणि स्वतःला अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबविल्या जातात. या योजनांचे निकष समजून घेऊन त्यांचा अधिकाधिक लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.अध्यक्षीय मनोगतात ज्योती निंबाळकर म्हणाल्या की, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात या प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे. या केंद्रावर सुमारे साडेतीनशे शिक्षकांसाठी दहा दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणातून मिळणारे साहित्य, ज्ञान आणि अनुभव यांच्या माध्यमातून शिक्षणातील नवीन प्रवाहांशी जोडून घ्यावे. त्यामुळे अध्यापनाची पद्धत अधिक प्रभावी होण्याबरोबरच शिक्षणाची प्रक्रिया विद्यार्थ्यांसाठी आनंददायी बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.सुनील नरसाळे यांनी शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी आणि त्यासंदर्भातील निकष याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संदीप वाकचौरे यांनी केले, तर सुनील घुले यांनी आभार मानले.यावेळी सुलभक प्रकाश पारखे, सदानंद डोंगरे, प्रा. सुरेखा भवर, श्री. मधे, प्रदीप बागुल, कविता ढोमसे, श्री. शिंदे, अनिल सातपुते, गणेश सांगळे, श्रीमती दातीर, अरविंद सगभोर, मनीषा दातीर, कैलास वाघमारे, संध्या अरगडे, वैशाली अभंग यांच्यासह शिक्षक व सुलभक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहीर नोटीस

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यावस्था अधिनियम १९५० चे कलम ३६ (१) (अ) अंतर्गत

अर्ज क्र. ३७/२०२६

न्यासाचे नावः सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर

न्यासाचा पत्ताः संगमनेर, जिल्हा अहमदनगर (अहिल्यानगर)

न्यास नोंदणी क्र.: एफ-६४/अहमदनगर

मा. धर्मादाय सह आयुक्त-२ पुणे, धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे ४५/२. कै. बा.स. ढोले पाटील रोड, पुणे ४११००१ यांचे आदेशान्वये सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर, न्यास नोंदणी क्र. एफ ६४/अहमदनगर, अर्ज क्र. ३७/२०२६ कलम ३६ (१) (अ) सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये या न्यासाचे खालील वर्णन केलेली स्थावर मिळकत (आहे त्या स्थितीत) विक्री करावयाची आहे. त्याकरिता नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत त्याकरिता सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या सीलबंद निविदा दि १७/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत उपरोक्त नमूद कार्यालयाच्या पत्त्यावर मा. धर्मादाय सह आयुक्त-२, पुणे विभाग पुणे, ४५/२, कै. बा.स. ढोले पाटील रोड, पुणे ४११००१ यांच्या दालनात सर्वासमक्ष उघडण्यात येतील. निविदा फॉर्म भरणाऱ्यांनी निविदेत कोणत्याही प्रकारच्या अटी व शर्ती घातलेल्या निविदा विचारात घेण्यात येणार नाहीत.

निविदाधारकांनी निविदेत जी रक्कमेच्या ३०% रक्कमेचा डी.डी. (Demand Draft) हा न्यासाच्या नावे निविदेसोबत देणे बंधनकारक राहील. सर्व निविदाधारकांनी दि १७/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजे पर्यंत नमूद दालनात हजर राहावे. दालनात सर्वासमक्ष निविदा उघडल्यानंतर हजर असणाऱ्या निविदाधारकाला आपली बोली वाढविण्यासाठी संधी देण्यात येईल. सर्वात जास्त रक्कम बोली असलेल्या निविदाधारकाची निविदा स्वीकारली जाईल.

निविदाधारकास बोलीच्या फरकाची रक्कम अनामत रक्कमेच्या (Earnest Money) डिमांड ड्राफ्ट स्वरूपात न्यासाच्या नावाने मा. धर्मादाय सह आयुक्त-२, पुणे विभाग पुणे यांचे आदेशाप्रमाणे दिलेल्या मुदतीत या कार्यालयात जमा करावी लागेल. तसेच मा. धर्मादाय सह आयुक्त-२, पुणे विभाग पुणे यांचा निर्णय सर्वांवर बंधनकारक राहील, नमूद मिळकत विक्री करण्यास परवानगी देणे अथवा नाकारणे याबाबतचा संपूर्ण अधिकार मा. धर्मादाय सह आयुक्त-२, पुणे विभाग पुणे यांचा राहील.

मूल्यांकन अहवालाप्रमाणे सदर विक्रीची परवानगी मागितलेल्या मिळकतीचे मूल्य रुपये ५,७३,५८,०००/- (अक्षरी रु. पाच कोटी त्र्याहत्तर लाख अठ्ठावन्न हजार फक्त) दर्शविले आहे. त्यामुळे सदर रक्कमेपेक्षा कमी रक्कमेची निविदा भरू नये.

जर निविदाधारकांनी सदर रक्कमपेक्षा कमी रक्कमेची निविदा भरली तर तशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

मिळकतीचे वर्णन सिटी सर्व्हे नं. ३५६१ (मधील नवीन इमारती मधील १२ गाळे व ३ ऑफिस) मौजे संगमनेर बु, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील मिळकत.

अं.नं.		तपशिल	प्रमाण	दर (स्क्वे.मी.)	एकूण रक्कम
१	तळ मजला	गाळा नं.१०१	३६.००	१,५०,०००.००/-	५४,००,०००.००/-
२		गाळा नं.१०२	३६.००	१,५०,०००.००/-	५४,००,०००.००/-
३		गाळा नं.१०३	३६.००	१,५०,०००.००/-	५४,००,०००.००/-
४		गाळा नं.१०४	३६.००	१,५०,०००.००/-	५४,००,०००.००/-
५		गाळा नं.१०५	२२.९९	१,५०,०००.००/-	३४,४८,५००.००/-
६		गाळा नं.१०६	२२.९९	१,५०,०००.००/-	३४,४८,५००.००/-
७		गाळा नं.२०१	३६.००	१,००,०००.००/-	३६,००,०००.००/-
८		गाळा नं.२०२	३६.००	१,००,०००.००/-	३६,००,०००.००/-
९	पहिला मजला	गाळा नं.२०३	३६.००	१,००,०००.००/-	३६,००,०००.००/-
१०		गाळा नं.२०४	३६.००	१,००,०००.००/-	३६,००,०००.००/-
११		गाळा नं.२०५	२२.९९	१,००,०००.००/-	२२,९९,०००.००/-
१२		गाळा नं.२०६	२२.९९	१,००,०००.००/-	२२,९९,०००.००/-
१३	दुसरा मजला	ऑफिस नं.३०१	७४.७६	५०,०००.००	३७,३८,०००.००/-
१४		ऑफिस नं.३०२	७४.७६	५०,०००.००	३७,३८,०००.००/-
१५		ऑफिस नं.३०३	४७.७४	५०,०००.००	२३,८७,०००.००/-
				एकूण	५,७३,५८,०००.००/-

चतुर्सिमा खालीलप्रमाणेः

पूर्वेसः सिटी सर्व्हे नं. ३५६१ मधील क्षेत्र

पश्चिमेसः पुणे-नाशिक हायवे

उत्तरेसः स. नं. सिटी सर्व्हे नं. ३५६१ मधील क्षेत्र

दक्षिणेसः संगमनेर नगरपरिषद सिटी सर्व्हे नं. ३५६४

सदर मिळकतीबाबत ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय सह आयुक्त-२, पुणे विभाग पुणे यांचे शिक्क्यानिशी आज दि. ०४ नोव्हेंबर, २०२६ रोजी दिली.

शिक्का

अधीक्षक (न्याय)
न्यास नोंदणी कार्यालय,
पुणे विभाग,पुणे.

विकास जाधव यांची भाजप अनुसूचित जाती मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

युवावार्ता (प्रतिनीधी)

संगमनेर : भारतीय जनता पार्टीच्या अनुसूचित जाती मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी संगमनेर येथील पै. विकास जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय दादा विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली,भाजपा जिल्हाध्यक्ष नितीनजी दिनकर तसेच भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दिलीपजी त्रिभुवन यांच्या नेतृत्वाखाली ही निवड करण्यात आली. नवनियुक्त जिल्हा उपाध्यक्ष पै.विकास



जाधव यांनी पक्षाने दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करून अनुसूचित जाती समाजाच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी, समाजाच्या विकासासाठी तसेच पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, आगामी काळात त्यांच्या माध्यमातून पक्ष संघटनेला संगमनेर तालुक्यात अधिक बळ मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME
VIJAY SITARAM AHER
(PASSPORT) (BEFORE NAME)
TO NAME AS
VIJAYKUMAR SITARAM AHER
(AADHAR NO. 364326568266)
FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC
PLACE: SANGAMNER DATE: 01/09/2026

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

दिगंबर नवाळी यांची राज्य संघटकपदी अधिकृत नियुक्ती

बीजमाता राहिबाई पोपेरे यांच्या हस्ते सन्मान



युवावार्ता (प्रतिनीधी) राजूर/ प्रतिनिधी निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने घाटघर, भंडारदरा (तालुका अकोले, जिल्हा अहिल्यानगर) येथे आयोजित करण्यात आलेल्या दहाव्या राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन २०२६ मध्ये दिगंबर भास्कर नवाळी यांची मंडळाच्या महाराष्ट्र राज्य संघटकपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली. मंडळाचे अध्यक्ष प्रमोद दादा मोरे यांच्या हस्ते नवाळी यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी पर्यावरण संवर्धन, सामाजिक कार्य आणि निसर्ग संरक्षणाच्या क्षेत्रात कार्य करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. पद्मश्री पुरस्कारप्राप्त बीजमाता राहिबाई पोपेरे यांच्या हस्ते दिगंबर नवाळी यांचा सन्मान करण्यात आला. या संमेलनात पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण, प्रदूषण नियंत्रण आणि सामाजिक जनजागृती यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर विचारमंथन करण्यात आले. राज्य संघटकपदी नियुक्ती झाल्याबद्दल.नवाळी यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत असून,या माध्यमातून महाराष्ट्रभर पर्यावरण संरक्षणाची चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी ते योगदान देतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.या राज्य संघटक निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रमोद मोरे, रामनाथ भोजने, नामदेव गंभीरे, महेश पाडेकर बाळासाहेब डोंगरे सह आदींनी अभिनंदन केले.

तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ मृत्यू नोंद/६३७/२०२६
दिनांक - १५/१०/२०२६

जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. रामकिसन कुंडलीक सानप, रा. पारेगाव खु.**, यांनी **दिनांक ०८/१०/२०२६** रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. पारेगाव खु.,** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची **बहिण कौशाबाई कुंडलीक सानप** यांचा **मृत्यू** मौजे **पारेगाव खु. ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे दिनांक २५/०४/२०२५ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **मृत्यू** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पारेगाव खु. यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पारेगाव खु. यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन १५ दिवसाचे आत सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

तहसिलदार संगमनेर

पाहिजेत
डॉ. बापूसाहेब काकड
ओम साई हॉस्पिटल
नर्सिंग व नॉन नर्सिंग स्टाफ भरणे आहे
(Nursing & non-nursing)
- Day Duty
- Night Duty
Om sai Hispital
vidhya nagar
02425-223242 / 7507723242

स्क्रॅप मटेरियल विकणे आहे
जुने खराब लोखंडी सळ्या, पत्रा, पुठ्ठा, प्लास्टिक ई. मटेरियल विकणे आहे.
मटेरियल खालील ठिकाणी पाहायला मिळेल
संपर्क :-
रोटरी आय केअर ट्रस्ट, नगरपालिका कंपाऊन्ड,संगमनेर

संपादकीय...

समाजमाध्यमांवरील अफवा आणि समाजातील वाढता द्वेष!

आजचे युग हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. मोबाईल आणि इंटरनेटमुळे जग अक्षरशः माणसाच्या हातात आले आहे. फेसबुक, व्हॉट्सप, इन्स्टाग्राम, एक्स यांसारख्या समाजमाध्यमांनी संवादाची साधने बदलून टाकली आहेत. जगाच्या एका कोपऱ्यात घडलेली घटना काही क्षणांत दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचते. माहितीचा हा वेग निश्चितच कौतुकास्पद आहे; मात्र याच वेगाने पसरणाऱ्या खोट्या बातम्या, अफवा आणि द्वेषपूर्ण संदेशांनी समाजासमोर एक गंभीर आव्हान उभे केले आहे. समाजमाध्यमांचा मूळ उद्देश माणसांना जोडणे, विचारांची देवाणघेवाण करणे आणि माहितीचे आदानप्रदान करणे हा आहे. परंतु आज अनेकदा हीच माध्यमे माणसांमध्ये दरी निर्माण करण्याचे काम करताना दिसतात. एखाद्या घटनेचा अर्धवट व्हिडिओ, जुने छायाचित्र, चुकीच्या संदर्भात प्रसारित केलेली बातमी किंवा बनावट संदेश पाहताच त्याची सत्यता तपासण्याऐवजी तो पुढे पाठवण्याची घाई केली जाते. परिणामी, एखादी छोटीशी अफवा मोठ्या सामाजिक तणावाचे कारण बनू शकते. विशेषतः जात, धर्म, भाषा आणि राजकीय विचारसरणीच्या आधारावर समाजात तेढ निर्माण करणारे संदेश मोठ्या प्रमाणावर फिरताना दिसतात. काही समाजकंटक जाणीवपूर्वक खोट्या माहितीचा वापर करून विशिष्ट समाजघटकांविषयी गैरसमज पसरवतात. भावनिक विषयांवर आधारित संदेशांना अधिक प्रतिसाद मिळत असल्याने अशा अफवांचा प्रसार वेगाने होतो. अनेकदा कोणतीही खातरजमा न करता लोक अशा संदेशांवर विश्वास ठेवतात आणि त्यातून सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता निर्माण होते. यातील सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे समाजमाध्यमांवरील द्वेष आता केवळ आभासी जगापुरता मर्यादित राहिलेला नाही. ऑनलाईन सुरू होणारे वाद प्रत्यक्ष जीवनातील संबंधांवर परिणाम करू लागले आहेत. एखाद्या व्यक्तीच्या मताशी सहमत नसल्यास त्याच्यावर वैयक्तिक टीका करणे, अपमानास्पद भाषा वापरणे, धमक्या देणे आणि चारित्र्यहनन करणे अशा प्रवृत्ती वाढताना दिसतात. मतभिन्नता असणे हा लोकशाहीचा आत्मा आहे; मात्र मतभिन्नतेचे रूपांतर शत्रुत्वात होणे ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. राजकीय क्षेत्रातही समाजमाध्यमांचा वापर अनेकदा चुकीच्या पद्धतीने केला जातो. विरोधकांवर टीका करण्याऐवजी त्यांच्याविषयी खोटी माहिती पसरवणे, अर्धवट व्हिडिओ प्रसारित करणे आणि समाजात संभ्रम निर्माण करणे अशा प्रकारांना प्रोत्साहन मिळते. विचारांची लढाई मुद्द्यांवर होण्याऐवजी व्यक्तिद्वेषावर केंद्रित होत आहे. अशा वातावरणात सामान्य नागरिकांना सत्य आणि असत्य यातील फरक ओळखणे कठीण बनते. या समस्येचे आणखी एक गंभीर कारण म्हणजे माहितीची सत्यता तपासण्याची कमी झालेली सवय. अनेक जण संदेशाचा स्रोत, तारीख किंवा संदर्भ न पाहता तो पुढे पाठवतात. एखादा संदेश अनेक लोकांकडून आला म्हणजे तो खरा असणार, असा चुकीचा समज निर्माण होतो. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून तयार होणारे बनावट फोटो, व्हिडिओ आणि आवाज यामुळे ही समस्या अधिक गुंतागुंतीची बनत आहे. मग यावर उपाय काय? सर्वप्रथम प्रत्येक नागरिकाने डिजिटल साक्षरतेचे भान ठेवणे आवश्यक आहे. कोणताही संदेश पुढे पाठवण्यापूर्वी त्याची सत्यता तपासली पाहिजे. संशयास्पद माहितीला अधिक प्रसिद्धी देण्याऐवजी तिच्याकडे दुर्लक्ष करणे किंवा संबंधित यंत्रणेकडे तक्रार करणे गरजेचे आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनीही विद्यार्थ्यांमध्ये विवेकपूर्ण डिजिटल वापराची जाणीव निर्माण केली पाहिजे.

पोदार इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन दिमाखात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे वार्षिक स्नेहसंमेलन ४ व ५ नोव्हेंबर रोजी मालपाणी लॉन्स येथे उत्साहात संपन्न झाले. दोन दिवस चाललेल्या या सांस्कृतिक सोहळ्यात विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, संगीत आणि अभिनयाच्या माध्यमातून आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी 'द फ्रेंडशिप कोड' या संकल्पनेतून मैत्री, बहीण-भावंडांचे नाते, आत्मसन्मान आणि राष्ट्रनिष्ठा यांचे महत्त्व अधोरेखित केले. दुसऱ्या दिवशी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी 'द रिटर्न ऑफ विक्रम वेताळ' या संकल्पनेतून 'मेक इन इंडिया', नवे बॉलीवूड आणि ऑनलाइन गेमिंगचे दुष्परिणाम यांसारख्या विषयांवर मनोरंजनातून प्रबोधन केले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले भव्य 'महाभारत'. प्रभावी अभिनय, दमदार संवाद, आकर्षक वेशभूषा आणि नेत्रदीपक रंगमंचीय सादरीकरणामुळे उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. शिक्षकांनीही नृत्याविष्कारातून कार्यक्रमात रंगत आणली. यावेळी शाळेच्या प्राचार्या सौ. मीनाक्षी मिश्रा यांनी वर्षभरातील शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक यशाचा आढावा घेतला. शाळेच्या पहिल्या दहावीच्या बॅचमधील कु. निवेदिता नवाटे हिने ९९.८० टक्के गुण मिळवून जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल विशेष कौतुक केले. पहिल्या दिवशी पोदार एज्युकेशन नेटवर्कचे मेंटर प्रिन्सिपल श्री. निलेश पाटील, तर दुसऱ्या दिवशी नाशिक हबचे जनरल मॅनेजर तथा निवृत्त विंग कमांडर श्री. समीर वाघळे आणि पोदार इंटरनॅशनल स्कूल, पाथर्डीच्या प्राचार्या श्रीमती नीती जोनाथन उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या दोन दिवसीय सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्या सौ. मीनाक्षी मिश्रा, उपप्राचार्य श्री. योगेश आवारी, कार्यक्रम समन्वयक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. आभारप्रदर्शन आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

सहली रद्द करून जपली सामाजिक बांधिलकी!

युवावार्ता (प्रतिनिधी)

वडगाव पान - महाराष्ट्र राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकरी बांधवांवर ओढवलेले नैसर्गिक संकट लक्षात घेऊन सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाजाचे डी. के. मोरे जनता विद्यालय, वडगाव पान (ता. संगमनेर) या विद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील शैक्षणिक सहली रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांची आर्थिक परिस्थिती आणि त्यांच्या अडचणींची जाणीव ठेवून विद्यालयाने हा संवेदनशील निर्णय घेतला आहे. केवळ आर्थिक बाबींचा विचार न करता सामाजिक बांधिलकी आणि शेतकरी कुटुंबांप्रती असलेली संवेदनशीलता जपत घेतलेल्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शेतकरी बांधवांच्या दुःखात सहभागी होत त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा विद्यालयाचा हा आदर्श इतर शाळांनीही घ्यावा, असा हा स्तुत्य उपक्रम आहे. या निर्णयाला सर्व पालकांनी सहकार्य करावे, असे आवाहन विद्यालयाच्या मुख्याध्यापक श्री पोपट दये ,उपमुख्याध्यापक प्रताप आहेर सहल प्रमुख श्री विकास पवार, बाळासाहेब कांडेकर व सर्व शिक्षक शिक्षकेतर वृंदांच्या वतीने करण्यात आले आहे. याचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

संगमनेर बसस्थानकासमोर लहुजी वस्ताद साळवे जयंती उत्साहात साजरी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त संगमनेर बसस्थानकासमोर जयंती उत्सव आनंदमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला विविध समाजातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लहुजी वस्ताद साळवे यांनी समाजातील वंचित, शोषित घटकांच्या हक्कांसाठी आणि स्वाभिमानासाठी केलेले कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे आहे. त्यांचे शौर्य, क्रांतिकारी विचार, सामाजिक जागृती आणि देशभक्तीचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने लहुजी वस्ताद साळवे यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या विचारांचा आदर्श समाजातील युवकांनी घेऊन सामाजिक एकता, बंधुभाव आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या जयंती उत्सवाच्या आयोजनासाठी संस्थापक विकास जाधव, खंबीर साथ ओंकार थोरात, विकास कांबळे,अध्यक्ष दिपक आव्हाड, उपाध्यक्ष हरीश थोरात , सचिव संदीप आव्हाड, खजिनदार अमर जाधव,कार्याध्यक्ष अमोल सातपुते, शुभम कांबळे, नवनाथ जाधव, स्वप्नील आव्हाड, रवि शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या आरती ताई पगारे, रील्स स्टार मालती जाधव, निलेश आल्हाट, राहुल तुपसुंदर यांच्यासह आयोजकांनी पुढाकार घेतला. यावेळी सर्व समाजबांधवांनी एकत्र येत लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मृतींना अभिवादन केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

विकणे आहे
खालील मशिनरी
ऑईल मिल पुर्ण सेट
शेंगदाण तयार करण्याचा पुर्ण सेट
तेल पॅकिंग करण्याचे पुर्ण सेट
१२००० लिटर (पेट्रोल पासिंगचा) चा टँकर
संगमनेर - 9822334431

पाहिजेत
एजन्सीसाठी मुले पाहिजेत
सेल्समन - २ जागा
हेल्पर - २ जागा
- संपर्क -
९४२२९०५१५५

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण - रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta

पाहिजेत
कामासाठी मुलगा पाहिजे - जागा -१
संगणक ज्ञान (Microsoft Excel, Tally Erp)
Kshitij Electricals & Instrumentation Works
१४११ संगम हाऊसींग सोसायटी, घुलेवाडी, संगमनेर
9822244035

Jijamata English Medium School
Pavbaki Road Sangamner, CBSE Affiliated School
WALK-IN INTERVIEW
We invite applications for the following positions:
Mother Teachers
Primary & Secondary Teachers
English I Hindi I Marathi I Maths
Social Science I Sport I Computer
Sunday 22nd November 2026
Time : 9:00 am. to 1:00 pm
Freshers can apply
Preference will be given to candidates fluent in English with teaching experince in CBSE Schools or other English Medium Schools
Interested Candidates can submit their updated resumes in person at the school before 20 November 2026 or by email to shewalepatiltrust@gmail.com/ dr.rahulshewale@gmail.com or in person at the school office.
Contact :- 9822304638

पीएफधारकांना मोठा दिलासा

खात्यातील ९० टक्के रक्कम काढता येणार

निवृत्तीनंतर SWP सुविधेलाही मंजुरी

नवी दिल्ली

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या (ईपीएफओ) सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रस्टीज (सीबीटी) बैठकीत पीएफ खातेदारांना मोठा दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयानुसार पीएफ खात्यातील किमान शिल्लक ठेवण्याचे प्रमाण २५ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे खातेदारांना त्यांच्या पीएफ खात्यातील उपलब्ध रकमेपैकी ९० टक्क्यांपर्यंत रक्कम काढण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

आतापर्यंत पीएफ खातेदारांना खात्यातील एकूण रकमेच्या किमान २५ टक्के रक्कम शिल्लक ठेवणे आवश्यक होते. त्यामुळे खात्यात मोठी रक्कम जमा असली तरी गरजेच्या वेळी संपूर्ण उपलब्ध रक्कम काढता येत नव्हती. मात्र, नव्या निर्णयामुळे ही मर्यादा कमी होऊन खातेदारांना अधिक रक्कम उपलब्ध होऊ शकणार आहे.

१० लाखांच्या ठेवीतून ९ लाख रुपये काढता येणार!- हा निर्णय उदाहरणासह समजून घेतल्यास, एखाद्या कर्मचाऱ्याच्या पीएफ खात्यात १० लाख रुपये जमा असतील, तर यापूर्वी किमान अडीच लाख रुपये खात्यात शिल्लक ठेवावे लागत होते. म्हणजेच जास्तीत जास्त साडेसात लाख रुपये काढता येत होते. मात्र, नव्या नियमानुसार खातेदाराला ९ लाख रुपयांपर्यंत रक्कम काढता येऊ शकते आणि केवळ एक लाख रुपये खात्यात शिल्लक ठेवावे लागतील. त्यामुळे आर्थिक अडचणीच्या काळात पीएफची रक्कम अधिक प्रमाणात उपयोगात आणणे शक्य होणार आहे.

निवृत्तीनंतर SWP सुविधेचा पर्याय- या बैठकीतील आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे निवृत्तीनंतर एकरकमी पैसे काढण्याऐवजी सिस्टिमॅटिक विड्रॉवल प्लॅन (SWP) या सुविधेला मंजुरी देण्यात आल्याची माहिती आहे. या सुविधेमुळे निवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या पीएफमधील संपूर्ण रक्कम एकाच वेळी काढण्याऐवजी ठरावीक अंतराने आवश्यकतेनुसार पैसे मिळवता येणार आहेत.

यामुळे उर्वरित रक्कम पीएफ खात्यात किंवा संबंधित गुंतवणूक व्यवस्थेत कायम राहून त्यावर नियमानुसार व्याज मिळण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. निवृत्तीनंतर नियमित आर्थिक गरजा भागविण्यासाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे. पीएफ ही कर्मचाऱ्यांच्या भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेसाठी असलेली महत्त्वाची बचत आहे. मात्र, अनेकदा वैद्यकीय खर्च, मुलांचे शिक्षण, घरबांधणी किंवा अन्य आर्थिक अडचणींसाठी मोठ्या रकमेची गरज भासते. अशा वेळी पीएफमधून अधिक रक्कम काढण्याची सुविधा मिळाल्यास कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळू शकतो.

एकीकडे गरजेच्या वेळी अधिक रक्कम काढण्याची मुभा, तर दुसरीकडे निवृत्तीनंतर टप्प्याटप्प्याने पैसे मिळविण्याचा पर्याय, यामुळे पीएफ खातेदारांसाठी आर्थिक नियोजन अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणी, पात्रता, पैसे काढण्याच्या अटी आणि डथझ सुविधेचे तपशील ईपीएफओच्या अधिकृत अधिसूचनेनुसार लागू होतील.

पाहिजेत
7th Heaven केकशॉपमध्ये जॉबसाठी फुलटाईम
महिला/ मुली - २ जागा
पुरूष/ मुले- २ जागा
वयोमर्यादा- २० ते ३५ वर्ष
सावता माळी नगर, संगमनेर
7447 877 877

पाहिजेत
नर्सिंग स्टाफ - बीएससी/जीएनएम (मॉर्निंग-२, इव्हीनींग-२, नाईट - २)
ऑपरेशन थिएटर टेक्निशियन (मॉर्निंग-२, इव्हीनींग-२)
रिसेप्शनिस्ट - (इव्हीनींग-२ ते १०)
डाटा एन्ट्री - बी. कॉम (१ जागा)
मावशी/ वॉर्ड बॉय (२ जागा)
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397

पाहिजेत
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
सेल्स सुपरवायझर - ०१
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
गोडाऊन सुपरवायझर- ०१
पत्ता - श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

सिद्धार्थ एंटरप्राईजेस
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड संगमनेर
पाहिजेत
एका नामांकित पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ (एमबीए असल्यास प्राधान्य)
ऑफिस असिस्टंट -१ (कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक)
कार ड्रायव्हर - १ (अनुभव असल्यास प्राधान्य)
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888





काकूच्या घरावरच पुतण्याचा डल्ला

दहा तोळे सोन्याचे दागिने लंपास, पुतण्या विरुद्ध राहुरी पोलिसांत चोरीचा गुन्हा



युवावार्ता (प्रतिनिधी)

राहुरी - नात्याला काळिमा फासणारी घटना राहुरी तालुक्यातील उंबरे येथे उघडकीस आली आहे. काकूच्या घरातील तब्बल दहा तोळे सोन्याच्या दागिन्यांवर पुतण्यानेच डल्ला मारल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी काकू संगीता शिवाजी शिरसाठ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पुतण्या वैभव बापुसाहेब शिरसाठ याच्याविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संगीता शिरसाठ यांनी वेळोवेळी खरेदी केलेले सुमारे दहा तोळे सोन्याचे दागिने घरातील किचनमध्ये सुरक्षित ठेवले होते. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घराची साफसफाई केल्यानंतर त्यांनी किचनमधील ओटचावर ठेवलेल्या पातेल्याखाली असलेल्या बॉक्समध्ये हे दागिने ठेवले होते.

दरम्यान, २७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास एका कार्यक्रमासाठी बाहेरगावी जायचे असल्याने त्यांनी दागिने काढण्यासाठी शोधाशोध केली. मात्र, नेहमीच्या ठिकाणी दागिने आढळून आले नाहीत. घरातील सर्व ठिकाणी शोध घेऊनही दागिने मिळून न आल्याने अखेर चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये राणीहार, एक मोठे गंठण, एक मिनी गंठण आणि कानातील झुंबर अशा एकूण दहा तोळे सोन्याच्या दागिन्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, संगीता शिरसाठ यांचा पुतण्या वैभव शिरसाठ याची त्यांच्या घरी वारंवार ये-जा असायची. त्यामुळे घरातील दागिने त्यानेच चोरून नेले असावेत, असा संशय त्यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत व्यक्त केला आहे.

या प्रकरणी वैभव बापुसाहेब शिरसाठ (रा. उंबरे, ता. राहुरी) याच्याविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून, या प्रकरणातील चोरीचा उलगडा होणार का, याकडे उंबरे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

बारावीचे सुधारित वेळापत्रक जाहीर

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावीच्या अर्थशास्त्राच्या पेपरची वेळ बदलली आहे. हा पेपर १७ फेब्रुवारी २०२७ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत होईल. परीक्षेची तारीख कायम असून, केवळ सत्र बदलले आहे, अशी माहिती मंडळाने दिली.

मूळ वेळापत्रकानुसार हा पेपर त्याच दिवशी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत होणार होता. सुधारित वेळापत्रकात तो सकाळच्या सत्राऐवजी दुसऱ्या सत्रात ठेवण्यात आला आहे. हा बदल कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांतील अर्थशास्त्र विषयासाठी लागू आहे.

बारावीच्या इतर विषयांच्या परीक्षांच्या वेळापत्रकात बदल केलेला नाही. दहावी आणि बारावीच्या लेखी परीक्षा पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत घेतल्या जाणार आहेत.

परीक्षांचे दिनांकनिहाय वेळापत्रक ६ नोव्हेंबर २०२६ पासून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यातील बारावीच्या अर्थशास्त्राच्या पेपरच्या सत्रात ही दुरुस्ती करण्यात आली आहे.

संकेतस्थळावरील वेळापत्रक केवळ माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना मंडळाकडून पाठवलेले छापील वेळापत्रक अंतिम असेल, असे मंडळाने स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांनी पेपरची तारीख, सत्र आणि वेळ यांची शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयाकडील छापील वेळापत्रकातून खात्री करावी, असेही मंडळाने सांगितले.

इतर संकेतस्थळांवरील किंवा अन्य यंत्रणांनी छापलेली वेळापत्रके ग्राह्य धरू नयेत. व्हॉट्सप किंवा तत्सम माध्यमांतून आलेल्या प्रतींवरही अवलंबून राहू नये, असे मंडळाने म्हटले आहे. विभागीय मंडळांनी शुद्धिपत्रक स्थानिक स्तरावर प्रसिद्ध करून मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना त्याची माहिती द्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. ही माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी दिली.

धाडकन कोसळले सोन्याचे भाव

मुंबई (वृत्तसंस्था)

सोने आणि चांदीच्या भावात गेल्या काही दिवसांपासून मोठी घसरण होताना दिसत आहे. त्यातच आजचे भाव पुढे आले असून मोठी घसरण सोन्याच्या भावात झाली. सोने नीचांकी जाताना दिसत आहे.



सोने आणि चांदीच्या भावात मोठी घसरण गेल्या काही दिवसांपासून होत आहे. त्यातच आज २० नोव्हेंबर २०२६ चे सोन्याचे दर पुढे आले असून सराफा बाजार मोठी खळबळ उडाली. सोन्याच्या भावात सर्वात मोठी घसरण झाली. काही दिवसांपूर्वी सोन्याचा भाव प्रति तोळा दोन लाखाच्या आसपास पोहोचला होता. सोने आणि चांदीच्या भावात मोठी घसरण गेल्या काही दिवसांपासून होत आहे. त्यातच आज २० नोव्हेंबर २०२६ चे सोन्याचे दर पुढे आले असून सराफा बाजार मोठी खळबळ उडाली. सोन्याच्या भावात सर्वात मोठी घसरण झाली. काही दिवसांपूर्वी सोन्याचा भाव प्रति तोळा दोन लाखाच्या आसपास पोहोचला होता.

आता सोने जवळपास त्याच्या उच्चाकांपेक्षा ६० हजारांनी घसरले आहेत. त्यातच आज सोन्याने त्याचा निचांका गाठला आहे. सोन्याच्या भावात एकाच दिवसात मोठी घसरण झाली. मागच्या आठ दिवसात सोने १२ हजार ४०० ने स्वस्त झाले. २० तारखेला आज मोठी घसरण सोन्याच्या दरात झाली.

सोन्यावर मोठा दबाव वाढला आहे. मुंबई आणि पुण्यात आत सोन्याचा भाव २४ कॅरेट सोन्याचा भाव हा प्रति १० ग्रॅम १ लाख ३० हजार ६८० रूपये झाला. २२ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १ लाख १९ हजार ७९० नोंदवण्यात आला. सोन्यावर मोठा दबाव वाढला आहे. मुंबई आणि पुण्यात आत सोन्याचा भाव २४ कॅरेट सोन्याचा भाव हा प्रति १० ग्रॅम १ लाख ३० हजार ६८० रूपये झाला. २२ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १ लाख १९ हजार ७९० नोंदवण्यात आला. ही सोन्याच्या भावात सर्वात मोठी घसरण म्हणावी लागणार. दिल्ली २४ कॅरेट सोने १ लाख ३० हजार ८३० रूपये प्रति १० ग्रॅम आहे. सोन्याच्या किंमतीमध्ये ही मोठी घसरण आहे. पुढील काही दिवसातही सोन्याच्या भाग अजून घसरण्याची शक्यता आहे. ही सोन्याच्या भावात सर्वात मोठी घसरण म्हणावी लागणार. दिल्ली २४ कॅरेट सोने १ लाख ३० हजार ८३० रूपये प्रति १० ग्रॅम आहे. सोन्याच्या किंमतीमध्ये ही मोठी घसरण आहे. पुढील काही दिवसातही सोन्याच्या भाग अजून घसरण्याची शक्यता आहे.

जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती गगणाला पोहोचत आहेत. मात्र, सोने आणि चांदीच्या किंमती चांगल्या कोसळताना दिसत आहेत. ऐन दिवाळीतही सोने स्वस्त होते. पुढील काही दिवसात सोने एक लाखाच्या आतमध्ये येईल, असे सांगितले जात आहे. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती गगणाला पोहोचत आहेत. मात्र, सोने आणि चांदीच्या किंमती चांगल्या कोसळताना दिसत आहेत. ऐन दिवाळीतही सोने स्वस्त होते. पुढील काही दिवसात सोने एक लाखाच्या आतमध्ये येईल, असे सांगितले जात आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे अमृतवाहिनीने अनेकांच्या जीवनात आनंद निर्माण केला – माजी मंत्री थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ग्रामीण भागात असूनही गुणवत्ता आणि उच्च दर्जाचे शिक्षण देण्याची परंपरा अमृतवाहिनी शिक्षण संस्थेने सातत्याने जपली आहे. या संस्थेतून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज देशात आणि परदेशात विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. शिक्षणाच्या माध्यमातून अनेकांच्या जीवनात आनंद आणि समृद्धी निर्माण करण्याचे काम अमृतवाहिनीने केले असून भविष्यातही गुणवत्तेचा हा वारसा अधिक सक्षमपणे जपण्यासाठी सर्वांनी सांघिक प्रयत्न करावेत असे प्रतिपादन राज्याचे माजी शिक्षणमंत्री तथा अमृतवाहिनी विद्यापीठाचे कुलपती लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले.



अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या वतीने आयोजित 'ऋणानुबंधाचा स्नेहमेळावा' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी आमदार डॉ.सुधीर तांबे, संस्थेच्या सेक्रेटरी सौ. शरयूताई देशमुख, डॉ. जयश्रीताई थोरात, विश्वस्त विलासराव वर्पे, प्राचार्य प्रा. व्ही. बी. धुमाळ, प्रा. जी. बी. काळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. संदीप निंबाळकर, प्राचार्य डॉ. प्रसाद बाविस्कर, डॉ. बाबासाहेब लोंढे, डॉ. राजेंद्र वाघ, डॉ. मच्छिंद्र चव्हाण, आशिष कुमार, विलास भाटे, जे. बी. सेठी, अंजली कन्नावार, डॉ. राहुल सातपुते उपस्थित होते.

यावेळी बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या दूरदृष्टीतून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे या उद्देशाने अमृतवाहिनी शिक्षण संस्थेची उभारणी झाली. आज या संस्थेतील अनेक अभियंते आणि माजी विद्यार्थी देशाच्या विविध भागांत तसेच परदेशात मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. संस्थेतील शिक्षण, संस्कार आणि आपुलकीच्या वातावरणामुळे माजी विद्यार्थ्यांचे संस्थेशी असलेले नाते आजही तितकेच घट्ट आहे. जम्मू - काश्मीरमधील लडाख असो, बिहारमधील पाटणा असो किंवा ऑस्ट्रेलियासारखा देश असो, आपण कुठेही गेलो तरी अमृतवाहिनीचे माजी विद्यार्थी अत्यंत आदराने एकत्र येतात आणि जुन्या आठवणींना उजाळा देतात. हा केवळ माजी विद्यार्थी आणि संस्थेतील संबंध नसून एक भावनिक ऋणानुबंध आहे. संस्थेने त्यांच्या जीवनात निर्माण केलेला आनंद, आत्मविश्वास आणि यशाची संधी यामुळेच हे नाते अधिक दृढ झाले आहे. अमृतवाहिनीने विद्यापीठासह कृषी महाविद्यालय आणि फूड टेक्नॉलॉजीसारखे नवीन शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू केले आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे पालक आणि विद्यार्थ्यांची अमृतवाहिनीला नेहमीच पहिली पसंती मिळत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (-ख) विविध क्षेत्रांत मोठी स्पर्धा निर्माण होत असली तरी शेती आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी भविष्यात मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या चिमण्यांनो, परत फिरा रे!



या चिमण्यांनो परत फिरा रे घराकडे अपुल्या जाहल्या तिन्हीसांजा .

ग दि माडगूळकर यांचे हे गीत, श्रीनिवास खळे यांची सुरेख चाल व स्वरसम्राज्ञीचे स्वर.अतिशय सुंदर अर्थपूर्ण गीत .अर्थात अभिप्रेत असलेली आर्तता, व्याकूळता व्यक्त करणारी चाल व श्रोत्यांच्या हृदया पर्यंत पोहोचवणारा स्वर.विषय गाण्याचा नसून निबंधाचा आहे. निबंधाला आशय मात्र गाण्याला अनुसरून हवा असणार. शिक्षणाच्या निमित्ताने मुले परदेशी जातात .पुढे तिकडची नोकरी स्वीकारून तिकडेच स्थायिक होतात. पूर्वी क्वचितच कोणी असे गेले व तिकडचे झाले की फार कौतुक वाटत असे. गेलेला आपल्या पालकांना बोलावून 'आम्ही इथे कसे वैभवात आहोत 'याचे प्रदर्शन घडवीत असत. परदेशवारी करून आल्यावर पालकही तोंड फाटेस्तोवर मुलाच्या कर्तृत्वाचे गोडवे गात असत .मात्र वय बोलू लागले की हेच पालक 'मुलांना वेळ नसतो यायला 'अशी मुलांची बाजू जगासमोर मांडत असले तरी मनात मात्र मुले जवळ नाहीत म्हणून कुढत असतात. मुले परदेशात मिळणारी प्रलोभने सोडून मायदेशी यायला तयार नसतात; तर पालक अनेक कारणांनी आपले घर सोडून परदेशस्थ मुलांकडे कायमचे जाण्यास तयार नसतात. इथेच भावनांची रस्सीखेच सुरू होते. मुलगा/ मुलगी परदेशात आहे हे सांगताना पालकांच्या चेहऱ्यावर अभिमान, कौतुक ओसंडून जात असतो. पूर्वी मुले-मुली परदेशात शिक्षणासाठी,अनुभव घेण्यासाठी जात व कालांतराने स्वखुशीने मायदेशी येत .तेव्हा मायदेशी येणाऱ्यांचे प्रमाण जास्त होते. परंतु अलीकडे चित्र फारच पालटले आहे. महाविद्यालयीन किंवा पदवी नंतरचे शिक्षण परदेशात जाऊन घेण्याचे स्वप्न पालक व मुले मुली शालेय विद्यार्थीदशेतच बघत असतात. पुढे त्यांच्या जाण्यासाठी पालकांकडूनच बरेच प्रयत्न केले जातात.

पूर्वी परदेशी गेलेल्यांशी संवाद साधायचे ' पत्र' हे एकमेव साधन होते. ते पाठवल्यावर पोहोचण्याचा काळही पंधरा-वीस दिवसांचा असायचा. त्यात एकमेकांना भेटायची ,एकमेकांची खुशाली जाणून घेण्याची उत्सुकता, ओढ, हुरहुर असायची. परंतु आधुनिक तंत्रज्ञानामुळे हव्या त्या क्षणी प्रत्यक्ष बघून बोलण्याच्या सुविधा उपलब्ध झाल्याने दूर असूनही प्रत्यक्षात भेटण्याची ओढ वाटेनाशी झाली आहे. ना मुलांना आई-वडिलांच्या ओढीने मायदेशी यावेसे वाटत, ना पालकांना आपले घर सोडून कायमचे मुलांकडे परदेशी जावेसे वाटत.

बदलत्या काळानुसार माणसाच्या भावनांमध्ये ही बदल होत असल्याचे स्पष्ट जाणवते .आपल्या देशात शिक्षण घ्यायचे. परदेशात जाऊन उच्च शिक्षण (?) घ्यायचे ,तिकडेच स्थायिक व्हायचे .म्हणजे आपल्या शिक्षणाचा फायदा आपल्या देशाला नाही तर पर-देशाला .ज्या हुशारीचा उपयोग- फायदा आपल्या देशाला नाही ,ती हुशारी काय कामाची ! बरे ,अशा परदेशस्थ मुलांच्या पालकांना असा प्रश्न विचारला तर 'त्यांच्या केलीबरची नोकरी इथे म्हणजे आपल्या या देशात मिळत नाही' असे उत्तर मिळते .आता कॅलिबर म्हणजे खरेतर सरळ सरळ पैसा .मात्र पैशासाठी तिकडे राहतात हे सत्य कोणीही पालक कबूल करीत नाहीत. पैशासाठी नाही ना राहात मुले तिकडे, तर मिळेल त्या पगाराची नोकरी इथे येऊन करण्यात कसला आलाय कमीपणा !

अनेक नामवंत डॉक्टर्स,उद्योजक, शास्त्रज्ञ गलेलठ्ठ पगाराचे अमिष सोडून आपल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या देशवासीयांना व्हावा म्हणून परत आले आहेत.

डॉक्टर पी.एस .रामाणी ,डॉक्टर श्रीखंडे, शंतनुराव किर्लोस्कर, नारायण मूर्ती, डॉक्टर जयंत नारळीकर, डॉक्टर माशेलकर ही काही उदाहरणे .

एक काळ निश्चितच असा होता की पालक खरोखरच मुलांची वाट बघत. त्यामध्ये उतारवयातील आधाराची अपेक्षा असायची, त्याच बरोबर मुलांमध्येही जबाबदारीची जाणीव असायची. आज जबाबदारीची जाणीव पैसे पाठवण्यापूरतीच मर्यादित दिसते. परंतु हळूहळू पालकांच्या व मुला-मुलींच्या मानसिकतेत बदल होत होत आज अमूलाग्र बदल झालेला दिसत आहे. अनेक कारणे यामागे आहेत.

प्रामुख्याने सांगायचे तर पूर्वी परदेशी जाणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प होते .त्यामुळे आपल्या माणसांच्या सोबतीची, सहवासाची गरज किंवा ओढ यामुळे मुलांना घराचे आकर्षण मायदेशी परत येण्यास भाग पाडत असे. सध्याच्या काळात परदेशात जाणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली व वाढत आहे. त्यामुळे स्वभाषिक ,स्वदेशी लोकांच्या वाढत्या संख्येने घराच्या ओढीने येणारी पावले मंदावली. भुरकन उडून गेलेले चिमणा- चिमणी परतीच्या वाटेवरफिरकनासे झाले.

दुसरे असे की अगोदर म्हटल्याप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे ,याचा परिणाम म्हणजे पालक व मुले यांच्यात भेटीचे अंतर राहिले नाही. दुरावा ,विरह, काळजी वाटण्याचे दिवस संपले. पत्रातून एकमेकांबद्दल वाटणारे प्रेम व्यक्त करणे संपले.जो तो आपापल्या कोशात राहू लागला. प्रत्येक जण व्यक्तिस्वातंत्र्य मिळवण्याच्या धडपडीत व्यस्त राहू लागला.

आज पालकांनाच मुलांनी इकडे येऊन आपल्या जवळ राहावे असे वाटत नाही .फक्त हे वास्तव ते प्रामाणिकपणे कबूल करीत नाहीत, ही खंत आहे .

अशा परिस्थितीत 'या चिमण्यांनो परत फिरा रे 'म्हणणारे पालकच हरवले आहेत; तिथे पाखरे येणार कोणाकडे? सगळ्यांच्याच डोळ्यांवर पैशाची झापडे लागली आहेत.

सुरुवातीला मुलगा-मुलगी परदेशात असतात हे समाजात कौतुकाने सांगायचे असते.(स्टेटस सिम्बॉल). नंतर आम्ही आमचे दोघे याची इतकी सवय होते की महिन्याभरासाठी मुले आली तरी आई-वडिलांनाच घरात पाहूण्यासारखे वाटू लागते. मुले येतानाच त्यांचा दर दिवशीचा कार्यक्रम ठरवून आलेली असतात. त्यांच्या शेड्युल बरोबर वावरताना पालकांची दमछाक होते .'मुले येणार- येणार, नंतर मुले आली ,त्यांच्याबरोबर महिना कसा गेला कळलेच नाही 'असे म्हणताना पालकांनी निवांतपणाचा सुस्काराच सोडल्याचे जाणवते.

काही पालक म्हणतील- भारतासारख्या देशात जिथे 'अतिथी देवो भव 'अशी संकल्पना अस्तित्वात असताना, आपल्याच मुलांबद्दल असे का वाटेल? परंतु त्यांच्या प्रश्नातच उत्तर दडले आहे. लेख वाचताना या उक्तीची आठवण होणे म्हणजे परदेशी गेलेली मुले अतिथी झाल्याचे निदर्शनास येते .

काही पालक म्हणतील -उत्तम गुणवत्ता, पात्रता असलेल्या आमच्या मुलांना परदेशातील उत्तम विद्यापीठात मग पाठवायचे नाही का? तिकडच्या चांगल्या पायाभूत सुविधा, पैशाला मिळणारे ७० ते ८० पट मूल्य नाकारावे का ?मुलांच्या प्रगतीच्या उंच भरारी च्या आड कसे यायचे म्हणून आम्ही मुलांना परदेशी पाठवतो. शिक्षणासाठी जरूर जावे, परंतु त्या शिक्षणाचा फायदा स्वतः पुरता मर्यादित न ठेवता आपल्या देशाला व्हावा हा मुद्दा आहे .७० ते ८० टक्के जास्त मूल्य का नाकारावे म्हणजेच आपला देश, आपली माणसे या पेक्षा पैशाला जास्त महत्त्व दिले जाते, हे पालक मान्य करीत नाहीत .

काहीजण आपल्याकडील मूलभूत सुविधांचा अभाव, पैशाचे होणारे अवमूल्यन, बेशिस्तपणा, अज्ञान ,अस्वच्छता ,प्रचंड लोकसंख्या हे मुद्दे पुढे करून परदेशस्थ मुलांचे समर्थन करतात. त्यांना विचारावेसे वाटते- परदेशात जाण्यापर्यंतचा पाया याच वातावरणात पक्का झाला आहे ना !मग त्यात सुधारणा होण्यासाठी तरुणांचा सहभाग असणे गरजेचे असताना, आपल्या देशातील कमतरता अधोरेखित करून मुलांच्या परदेशात राहण्याचे समर्थन करणे, योग्य नाही. काहीजण आपल्याकडील भ्रष्टाचार व आरक्षण या मुद्द्यांवर तरुण पिढी नाराज असते म्हणून तिकडे म्हणजे परदेशात जाण्यासाठी तिकडेच राहण्यासाठी इच्छुक असतात, असे म्हणतील. पण या म्हणण्यातून आपल्या देशाला आपणच कमी लेखतो. स्वकीयांपेक्षा परकीयांकडून फायदा होतो तो तर त्यांनाच सेवा (सर्विस) द्या ,ही वृत्ती दिसून येते. देशच नाही तर स्वकीयांबद्दल ची ओढ वैयक्तिक फायद्यापुढे मान तुकवते-हेच खरे .

अडचणीच्या वेळी काय अंत्यसंस्काराला सुद्धा मुले येत नाहीत ही ओरड करण्यात काहीच तथ्य नाही. यासाठी पालक स्वतः च जबाबदार असतात .

आपली सिस्टिम सुधारण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. त्यासाठी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. कदाचित यामुळे येत्या काही वर्षात चित्र बदलेल व आपल्या तरुणाईचा आपल्याच देशात राहून विकास करण्याकडे कल वाढेल अशी आशा करुया. .प्रत्येक गोष्टीला अपवाद असतो .त्यामुळे काही पालकांना माझे विचार मान्य होणार नाहीत, याची मला कल्पना आहे. परंतु ढोबळ पणाने' या चिमण्यांनो परत फिरा रे 'म्हणायचे दिवस आता राहिले आहेत, असे वाटत नाही.

यामिनी पानगावकर, ठाणे
मो. नं. 9324384570

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

चंदनापुरी घाटात धोकादायक दरडी हटविण्याचे काम

अत्याधुनिक क्रेनच्या साहाय्याने डोंगरकड्यांवर कामगारांकडून दरडी हटविण्याची मोहीम



संगमनेर (प्रतिनिधी)

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी घाटात डोंगरकड्यांवरून कोसळण्याच्या स्थितीत असलेल्या धोकादायक दरडी हटविण्याचे काम गेल्या दोन दिवसांपासून सुरू करण्यात आले आहे. घाटातून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे काम हाती घेण्यात आले असून, दरडी रोखण्यासाठी बसविण्यात आलेल्या तुटलेल्या लोखंडी संरक्षण जाळ्यांची दुरुस्ती तसेच आवश्यक ठिकाणी नवीन जाळ्या बसविण्यात येणार आहेत. चंदनापुरी घाटात यापूर्वी अनेकदा डोंगरांवरील मोठमोठ्या दरडी कोसळून थेट महामार्गावर आल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सातत्याने ऐरणीवर येत आहे. डोंगरकड्यांवरून दरडी कोसळू नयेत, यासाठी विविध ठिकाणी लोखंडी संरक्षण जाळ्या बसविण्यात आल्या आहेत. मात्र, काही ठिकाणी मोठ्या दरडींच्या धडकेने या जाळ्या तुटल्या असून, काही दरडी जाळ्यांमध्ये अडकलेल्या अवस्थेत आहेत.

सध्या घाटातील अनेक ठिकाणी लहान-मोठे दगड आणि दरडी संरक्षण जाळ्यांमध्ये अडकून खालील बाजूला लोंबकळत आहेत. या दरडी कधीही निसटून महामार्गावर कोसळण्याची शक्यता असल्याने त्या हटविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

या कामासाठी अत्याधुनिक क्रेनचा वापर करण्यात येत असून, क्रेनच्या साहाय्याने कामगारांना डोंगराच्या उंच कड्यांपर्यंत पोहोचविले जात आहे. तेथे कामगार जीव धोक्यात घालून संरक्षण जाळ्यांमध्ये अडकलेल्या दरडी आणि दगड हटविण्याचे काम करीत आहेत. त्याचबरोबर तुटलेल्या जाळ्यांची दुरुस्ती आणि गरजेनुसार नवीन संरक्षण जाळ्या बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

पुणे-नाशिक महामार्गावरील चंदनापुरी घाट हा वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा मार्ग असल्याने दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे सुरू असलेली ही मोहीम वेळेत पूर्ण करून घाटातील सर्व धोकादायक ठिकाणांची पाहणी करणे, तुटलेल्या संरक्षण जाळ्यांची दुरुस्ती करणे आणि भविष्यात दरडी कोसळण्याच्या घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

धांदरफळ खुर्द येथील बिरोबा मंदिर परिसराचे रस्ते काँक्रीटीकरण व स्ट्रीट लाईटचे काम पूर्ण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील धांदरफळ खुर्द येथील बिरोबा महाराज मंदिर परिसराच्या विकासाला आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून गती मिळाली आहे. प्रादेशिक विकास पर्यटन योजनेंतर्गत मंदिर परिसरातील रस्त्याचे काँक्रीटीकरण आणि स्ट्रीट लाईट बसविण्याचे काम अवघ्या चार दिवसांत पूर्ण करण्यात आले. गेल्या चाळीस वर्षांपासून प्रलंबित असलेली ही कामे यात्रेपूर्वी पूर्ण झाल्याने बिरोबा महाराजांच्या भक्तांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विकासकामांचे लोकार्पण सोमवार (ता.२३) यात्रेच्या दिवशी आमदार खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.



तालुक्याच्या पश्चिम भागातील बिरोबा महाराज मंदिर हे परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. यात्रेच्या काळात येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. मात्र, मंदिराकडे जाणारा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून उखडलेला होता. तसेच मंदिर परिसरात रात्रीच्या वेळी प्रकाशाची व्यवस्था नसल्याने भाविकांना ये-जा करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः यात्रेच्या काळात या समस्येमुळे भाविकांची गैरसोय होत होती. धांदरफळ खुर्द आणि परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बिरोबा महाराज मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करावे, तसेच मंदिर परिसरात प्रकाशाची व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी आमदार खताळ यांच्याकडे केली होती. ग्रामस्थांच्या या मागणीची दखल घेत आमदार खताळ यांनी मंदिर परिसराच्या सुशोभीकरण व विकासकामांना प्राधान्य दिले.

प्रादेशिक विकास पर्यटन योजनेंतर्गत मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात आले असून, रात्रीच्या वेळी भाविकांना सुरक्षितपणे ये-जा करता यावी, यासाठी परिसरात स्ट्रीट लाईट बसविण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ही दोन्ही कामे अवघ्या चार दिवसांत पूर्ण करण्यात आली. कामांचा वेग राखतानाच गुणवत्तेलाही प्राधान्य देण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

दगडाने ठेचून महिलेची हत्या

संशयितला पोलिसांनी घेतले ताब्यात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- दगडाने ठेचून खून केल्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने मृतदेह वनविभागाच्या दरीत फेकून देण्यात आला. संगमनेच्या पठारभागातील साकूर-खंडेरायवाडी परिसरातील हा प्रकार गुरूवारी समोर आला.

मनिषा रामदास चाचण (वय ४०) असे मृत महिलेचे नाव आहे. पोलिसांनी या प्रकरणी संशयिताला ताब्यात घेतले असून चौकशी सुरू असल्याचे समजते. मनिषा चाचण बुधवारपासून बेपत्ता होत्या. शोध घेवूनही त्या सापडत नसल्याने कुटुंबियांनी पोलिसांत त्या बेपत्ता असल्याची तक्रार दिली होती. गुरुवारी सकाळी साकूर-खंडेरायवाडी शिवारालगत असलेल्या वनविभागाच्या दरीत मृतदेह असल्याची बाब काही नागरिकांच्या निदर्शनास आली. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, पोलिस निरीक्षक संदीप वऱ्हाडे यांच्यासह पथक घटनास्थळी पोहचले.

मृत महिलेच्या चेहरा व डोक्याच्या भागावर दगडाने ठेचल्याच्या खुणा प्रथमदर्शनी दिसून आल्या. त्यामुळे घातपात करून खून करण्यात आल्याचा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात येत आहे. नगारिकांच्या मदतीने पोलिसांनी मृतदेह दरी बाहेर काढला. त्यानंतर तो मृतदेह बेपत्ता मनिषा चाचण यांचा असल्याचे समोर आले. त्यांचा खून कोणी व कशासाठी केला याचा उलगडा अद्याप झालेला नाही. श्वानपथक आणि फॉरेन्सिक टीमकडून पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. श्वानपथक आणि फॉरेन्सिक पथकालाही पाचारण करण्यात आले. या पथकांकडून घटनास्थळाची तपासणी करून आवश्यक पुरावे संकलित करण्याची प्रक्रिया करण्यात आली.

बुधवार दुपारपासून बेपत्ता असलेल्या चाचण यांचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळल्याने गांभीर्य वाढले आहे. पूर्वनियोजीत कट करून खून केला का? खुनाचे नेमका कारण काय? असे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

संगमनेरमध्ये शिवसैनिकांचा संताप

शायना एनसी आणि निरुपम यांच्या प्रतिमेला मारले जोडे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या आत्मचरित्रात्मक पुस्काची प्रत फाडताना, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने काल संगमनेरमध्ये तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान शिंदे गटाच्या प्रवक्त्या शायना एनसी आणि संजय निरुपम यांच्या प्रतिमेला जोडे मारून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

याप्रसंगी बोलताना ठाकरे गटाचे शहर प्रमुख अमित चव्हाण यांनी आरोप केला की, राज्यात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतिदिन पाळला जात असताना शिंदे सेनेचे प्रवक्ते शायना एनसी आणि संजय निरुपम यांनी वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडला आहे. हेच यांचे त्यांच्याविषयीचे बेगडी प्रेम आहे का? असा सवाल उपस्थित करत त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा या कृत्याला पाठिंबा आहे का, आणि नसेल तर त्यांनी या दोन्ही नेत्यांची पक्षातून तात्काळ हकालपट्टी करून बाळासाहेबांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी पत्रकाद्वारे केली आहे. तालुका संघटक राजू सातपुते यांनीही या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला. तसेच, महिला आघाडीच्या उपतालुका प्रमुख वैशाली वडतले यांनी आक्रमक पवित्रा घेत शायना एनसी यांना शिर्डी लोकसभा मतदारसंघात फिरू देणार नसल्याचा इशारा दिला आहे. या आंदोलनात शहर प्रमुख अमित चव्हाण, विधानसभा शहर प्रमुख बाळासाहेब घोडके, उपजिल्हा संघटक पप्पू कानकाटे, प्रकाश गायकवाड, भीमाशंकर पावसे, दीपक साळुंखे, असिफ तांबोळी, अमोल डुकरे, कैलास गायके, अशोक बडे, सपना देसाई, वैशाली वडतले, काजल राठोड, राजू सय्यद यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात कळणार शिवसेना कुणाची - राऊत

मुंबई (वृत्तसंस्था)

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषद घेत सर्वोच्च न्यायालयातील शिवसेना खटल्याची सुनावणी, राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि केंद्र सरकारच्या धोरणांवरून सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी आता अंतिम टप्प्यात आली असून, फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत अंतिम निकाल लागेल आणि आम्ही त्याबाबत पूर्णपणे आशावादी आहोत, असा दावा राऊत यांनी केला आहे.



ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात मांडलेल्या मुद्द्यांचा संदर्भ देत संजय राऊत म्हणाले, शिवसेनेला सुरुंग लावण्याचे कारस्थान भाजपने आधीच ठरवले होते आणि त्याची सर्व पाने आता सर्वोच्च न्यायालयात उलगडत आहेत. आमदार-खासदार फोडून सरकार बनवले जात राहिले आणि त्याला निवडणूक आयोगाचे पाठबळ मिळाले, तर देशात कोणतेही सरकार स्थिर राहणार नाही, हे कठोर सत्य सिब्बल यांनी न्यायालयात मांडले आहे. लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी आम्ही न्यायमंदिरात गेलो असून, भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी न्यायालय योग्य निर्णय देईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक मदतीवरून राऊत यांनी केंद्र व राज्य सरकारवर टीका केली. हा दुष्काळ जर गुजरात किंवा उत्तर प्रदेशात पडला असता, तर केंद्राकडून एक लाख कोटी रुपये गेले असते; पण महाराष्ट्राला केंद्राकडून एक दमडीही मिळणार नाही, असा आरोप त्यांनी केला.









दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25